# सरकारचीच जबाबदारी आहे.

महाराष्ट्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा महाराष्ट्र राज्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी अस्तित्वात आला. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३९ मध्ये देशातील प्रत्येक राज्याने अनुसरावयाच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट केली आहेत. ज्यामध्ये प्रत्येक राज्याने काही गोष्टी साध्य करण्यासाठी कोणत्या दिशेने धोरणे आखली पाहिजेत, हे सुध्दा स्पष्ट केलेले आहे. त्याचप्रमाणे **आर्थिक धोरण राबविताना परिणामी धनदौलतीचा व उत्पादन साधनांचा जनसामान्यांस अपायकारक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ नये ही अत्यंत महत्त्वाची बाब यात समाविष्ट करण्यात आलेली आहे.**

१९३७ साली स्थापन केलेल्या अंतरराष्ट्रीय सहकारी ऐक्यसमितीने खालिलप्रमाणे महत्त्वाची तत्वे निश्चित केलेली आहेत.

१. सर्वांना सभासद होण्याची मुभा, स्वयंसेवी, क्रियाशील सदस्यत्व.

२. लोकशाही तत्त्वांन्वये ताबा.

३. भांडवलावर मर्यादित व्याज.

४. सभासदांच्या व्यवहाराप्रमाणे ज्यादा फायद्याचा योग्य त्या पध्दतीने वापर.

५. राजकिय व धार्मिक समानत्व.

६. रोखीचा व्यवहार.

७. शिक्षणावर भर.

८. परस्पर सहकार.

एकंदरित सहकाराला सदस्यांच्या समान स्थानाला महत्त्व दिलेले आहे. **स्वयंस्फुतर्नि एकत्र येणे, हे सहकारातील महत्त्वाचे अंग आहे. आर्थिक पिळवणूक थांबविणे शक्य व्हावे म्हणून दलाली पध्दत बंद करावी, अशा प्रकारची शिफारस तत्कालीन कमिशनने केलेली आहे.** सहकार चळवळ ही नैतिक चळवळ असून ती वर्तणूकीवर अवलंबून आहे. **समाजाला उन्नतीकडे नेण्यासाठी दुसऱ्यांची जंगम मालमत्ता न बळकवता कष्ट करून संपत्ती जमवावी, असे मूळ तत्त्व सहकार चळवळीतच ठेवले गेले आहे.** प्राथमिक स्तरावर आर्थिकदृष्टया स्वयंपुर्ण अशा पतपेढ्या स्थापन करणे, ३ ते ४ मैल त्रिजेच्या क्षेत्राच्या परिसरातील ४ ते ५ हजार वस्तीच्या समुहाला अशा पतपेढ्यांचा उपयोग झाला पाहिजे, ही त्यापाठीमागची भूमिका होती. **पतपेढ्यांनी लहान माणसांची १०० टक्के गरज प्रथम भागवावी व तद्नंतर उरलेल्या रकमेचे वाटप मोठ्यांसाठी करावे, हा मूलमंत्र पतपेढ्यांमध्ये ठेवला होता.**

परंतु महाराष्ट्र राज्य सरकारची पतसंस्थांच्या बाबतची भूमिका मूळ तत्त्वाला तिलांजली देणारी ठरत चालली आहे. **राज्यातील ९५ टक्के पतसंस्था १ कोटी रूपयांच्या आत एकूण व्यवहार करणाऱ्या पतसंस्था आहेत.** त्या पतसंस्थांमध्ये चांगला व उत्तम शिकलेला, उत्तम प्रशिक्षित व चांगल्या पगाराचा सचिव / व्यवस्थापक असणे केवळ अशक्यप्राय आहे. आणि एवढे असूनदेखील याच पतसंस्थांनी राज्यामध्ये सर्वसामान्य व छोट्या माणसांसाठी ही आर्थिक गंगा सहजपणे जनतेच्या दारापर्यंत नेली. मोठ्या प्रमाणात कष्टाने, जिद्दीने व विश्वासाने ठेवी जमा केल्या व मोठ्या प्रमाणात त्यामधून कर्ज वाटपही केले. अशा परिस्थितीत झालेली थकबाकी वसुल करण्यासाठी सहकार कायद्याचा वेळोवळी सरकारनेच बट्याबोळ केला. उदाहरणेच द्यावयाची झाली तर –

१. थकबाकी वसुलीसाठी कलम १०१ अंतर्गत ॲवार्ड मिळणेसाठी प्रत्येक केसमागे अनधिकृतपणे परंतु राजरोसपणे पैसे द्यावे लागतात.

२. ॲवार्ड मिळणेसाठी कालमर्यादा निश्चित ठरलेली असताना देखील सरकार याचा रोज भंग करीत आहेत.

३. मिळालेल्या ॲवार्डची अंमलबजावणी करणेसाठी एस.आर.ओ. पैशाशिवाय देण्याची एकही घटना राज्यात नाही.

४. एस.आर.ओ. ला पोलिसांचे संरक्षण कायद्याप्रमाणे सुध्दा मिळत नाही.

५. पतसंस्थांना बँकांप्रमाणे डिपॉझिटची गॅरंटी घेणेसाठी राज्यसरकार सपशेल अपयशी ठरलेले आहे.

एकंदरीत ज्याने ज्या कायद्याच्या आधारे पतसंस्थांना जन्माला घातले, त्यांचे संरक्षण, संवर्धन व न्याय्य भूमिका योग्य कालावधीत स्विकारण्याची कायदेशीर जबाबदारी राज्य सरकार घेणे टाळीत आहे.

**राज्य सरकारने नेमलेले सहकार खात्याचे अधिकारी कामाच्या दिवशी सरासरी ८५ टक्के वेळ सुध्दा आपल्या कार्यालयात उपलब्ध नसतात. हे सुध्दा सरकारचेच अपयश आहे.** एका अधिकाऱ्याला अनेक जबाबदाऱ्या देऊन त्यांचेकडून हवी तशी चाकोरीच्या बाहेर जाऊन कार्यपध्दती अवलंबण्यात सरकार दिवसेंदिवस आपला वेग वाढवीत आहे.

राज्यातील पतसंस्थांमधील ही जीवघेणी सरकारची कामाची पध्दत पतसंस्थांना टारगेट करीत आहे. पतसंस्थांनी कर्जातून ठेवी घ्यायच्या नाहीत, इमारत निधी घ्यायचा नाही. असा आदेश हे सरकार काढीत असताना सहकारी साखर कारखान्यांना मात्र हेच काम करण्यासाठी सरकार दररोज पायघड्या पसरवून तैनातीला उभे रहाते. ही बाब अत्यंत क्लेशकारक आहे. आणि त्यामुळे पतसंस्थांनी न्याय नेमका कोणाकडे मागायचा हा खरा प्रश्न या राज्यात उभा राहिलेला आहे.

काही दलालांना हाताशी धरून एक-दोन टक्क्यांसाठी सरकार काम करू शकत नाही. आणि हेच टक्क्यावाले पैशांच्या जोरावर सरकारला व सरकारच्या मधल्या एजंसीला पतसंस्थांविषयी खोटे चित्र उभे करीत आहे. पतसंस्थांमध्ये संचालक म्हणून निवडून यायला डिपॉझीट ठेवण्याची सक्ती या राज्यसरकारने करून **पैशावाल्यांसाठी ही पतसंस्थांची चळवळ खुल्या अर्थव्यवस्थेच्या नावाखाली बेशरमपणे गहाण ठेवली आहे.** आणि हेच शल्य राज्यातल्या पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांचे आहे. **परंतु राज्यसरकारला हे सर्व आत्मघातकी आदेश, निर्णय, कायद्यातील तरतुदी भविष्यकाळात मागे घ्यावे लागतील,** अशा प्रकारची स्फोटक परिस्थिती राज्यात उभी होत चाललेली आहे. आणि यासाठी आम्ही पुढाकार घेत आहोत. सर्व काही संपल्यावर नंतर जागे होणे कोणाच्याही फायद्याचे नाही. म्हणून महाराष्ट्र राज्याच्या सरकारने सर्वसामान्यांच्या पतसंस्थांच्या हिताचे म्हणजेच ठेवीदारांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वत: स्विकारण्यासाठी वर उल्लेख केलेले मूळ प्रश्न सोडविले पाहिजेत. त्यासाठी आमच्यासारख्यांच्या आंदोलनाची कृपया वाट पाहू नये.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!**